सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : २२ | बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१५ ऑक्टोबर

- गोपाळ गणेश आगरकर यांनी सुधारक पत्र सुरू केले.
- टाटा एअरलाइन्सने पहिल्यांदा उड्डाण केले. जे.आर.डी. टाटा यांनी हे विमान कराचीहून मुंबईत आणले आणि नागरी विमानसेवा सुरू केली. या कंपनीचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर एअर इंडिया अस्तित्वात आली.
- हरगोविंद खुराणा यांना नोबेल पारितोषिक.
- भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज या कादंबरीला साहित्यातील प्रतिष्ठित बुकर पुरस्कार मिळाला.
- भारताच्या गीत सेठी यांना ग्लोबल फ्रेड डेव्हिस पुरस्कार प्रदान.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# बळीराजासाठी 'मविआ'चा आज जनआक्रोश मोर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शासन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत बनवा बनवी करित असल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतर्फे बुधवार, दि. १५ रोजी दुपारी एक वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहापासून जनआक्रोश मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा प्रांताधिकारी कार्यालयावर जाईल.

अवर्षणप्रवण असलेल्या अमळनेर तालुक्यात जून महिन्यात पेरणी झाल्यावर पावसाने दांडी मारली आहे. त्यामुळे ४० टक्के शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. १५ जुलैपर्यंत नियमित पाऊस झाला. मात्र, १५ जुलै ते १४ ऑगस्टपर्यंत पावसाचा मोठा खंड पडला. परिणामी उडीद, मूग, सोयाबीन, मका या पिकांवर झाला. उत्पन्नात प्रचंड घट निर्माण झाली. १५ ऑगस्टनंतर सप्टेंबरपर्यंत सतत पाऊस पडत राहिला. त्यामुळे कापसाच्या पिकावर लाल्याचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम हातातून गेला.



### मोर्चातील प्रमुख मागण्या

ऑगस्टमध्ये झालेल्या पंचनाम्यानुसार १ हजार ५८६ शेतकऱ्यांनाच फक्त नुकसान भरपाई मिळणार आहे. त्यामुळे तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन ७/१२ कोरा करावा. अमळनेर तालुक्यातील आठही मंडळातील २०२१ चे अतिवृष्टीचे अनुदान देण्यात यावे. हमीभावाप्रमाणे मका, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तूर यांची शासकीय खरेदी सुरू करावी. अमळनेर तालुक्यातील खरीप पिकांना पीक विमा मंजूर करावा.

माजी खासदार उन्मेश पाटील, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील हे मोर्चाचे नेतृत्व करतील. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने जमावे, असे आवाहन किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष पाटील, प्रा. अशोक पवार, सुरेश पाटील, रा. कॉ. तालुकाध्यक्ष डी. एम. पाटील, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष राजेंद्र मराठे, काँग्रेस तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, कारभारी आहेर, धनगर पाटील, प्रशांत निकम, देवेंद्र देशमुख, गजेंद्र साळुंखे, संदीप घोरपडे, चंद्रशेखर भावसार, मोहन भोई, दिनेश पवार, मनोहर पाटील यांनी केले आहे.

# सत्ताधाऱ्यांची भांडवलदारांना साथ अन् शेतकऱ्यांचा केला घात : प्रा. अशोक पवार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रावर सध्या ९ लाख कोटी रुपयांची कर्ज आहे. सत्ताधारी पक्षाकडे राजकारणी फोडण्यासाठी पैसे आहे, पक्ष फोडण्यासाठी पैसा आहे. मात्र, पावसामुळे हवालदिल झालेल्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी पैसा नाही हे दुर्दैव आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च जास्त, हमीभाव नाही, नुकसान भरपाई नाही, पिक विमा नाही, खते, बियाणे, कीटकनाशके महाग, कर्जमाफी नाही त्यामुळे शेतकरी कुटुंब उध्वस्त झाले. ५० टक्केच्या वर शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. सन २०२४ ते एप्रिल २०२५ पर्यंत महाराष्ट्रात ३ हजार ५०४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. जळगाव जिल्ह्यात गेल्या आठ महिन्यात १४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.



> केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क हटविल्यामुळे कापसाचे भाव ५ हजार ५०० पर्यंत कोसळले आहेत. हमीभाव ८ हजार १०० रुपये आहे. सरकारी केंद्र सुरू नसल्याने कमी भावात शेतकरी आपला कापूस विकत आहेत. २०२१ मध्ये अमळनेर तालुक्यात आठही महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. पंचनाम्यासह ५३ कोटी रुपये नुकसान भरपाईचा प्रस्ताव प्रशासनामार्फत राज्य शासनाकडे गेला. शेतकऱ्यांनी पाठपुरावा व आंदोलने केली. मात्र, आजपर्यंत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही.
> **– प्रा अशोक पवार**, अमळनेर.

भारतात सुमारे ६० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. केंद्र सरकारच्या २०२५ च्या एकूण बजेटमध्ये शेतीवर फक्त २. ९ टक्के तरतूद केलेली आहे. गेल्या सहा वर्षात शेती बजेटमध्ये २५ टक्के कपात, खतावरील अनुदानात तीन वर्षात ४८ टक्के कपात व ग्रामविकास मंत्रालयाच्या बजेटमध्ये पाच वर्षात ३३ टक्के कपात. आजपर्यंत ११ वर्षात शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन फोल ठरले. मात्र, २०१४ मध्ये भारतात ७४ विमानतळ होते ते दहा वर्षात २०२५ मध्ये १६० विमानतळे झाली विमानतळे मात्र दुप्पट झाली.

ऑगस्ट २०२५ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री यांनी संसदेत माहिती दिली, की दहा वर्षांपूर्वी केंद्र सरकारवर ७०. २८ लाख कोटी कर्ज होते. ते आज २००. १६ लाख कोटी रुपयांपर्यंत पोचले आहे.

दहा वर्षात तिप्पट कर्ज वाढले. व्याजापोटी १२.७६ लाख कोटी द्यावे लागतात. २०१९ मध्ये कोणीही मागणी केली नसताना कंपनी कर ३० टक्के वरून २२ टक्के केला. त्यामुळे दरवर्षी देशाचे दीड लाख कोटी नुकसान होत आहे. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपच्या नावावर कंपन्यांना अनुदान, दहा वर्षात कंपन्यांची कर्जमाफी २५ लाख कोटी (व्याज वेगळे), अकरा वर्षात कंपन्यांची करमाफी ६० लाख कोटीपेक्षा जास्त आहे. दरवर्षी श्रीमंतांना दिल्या जाणाऱ्या सवलतीमुळे केंद्र सरकारचा महसूल घटत आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये अदानी ग्रुपला भागलपूर बिहार पॉवर प्लांटसाठी एक रुपया प्रति एकर या दराने १०२० एकर जमीन २५ वर्षाच्या भाडेतत्त्वावर देण्यात आली. महाराष्ट्राचे २०२५ चे बजेट सुमारे ७. ५० लाख कोटी रुपये आहे. मात्र, शेतीवरील तरतूद केवळ ९ हजार कोटी रुपये आहे. उलट तेलंगणा, केरळ, पंजाब यांचे अनुक्रमे बजेट ३. ५० लाख कोटी व २. ५० लाख कोटी रुपये आहे. मात्र, त्यांची शेतीवरील तरतूद ४ हजार ५०० कोटीच्यावर आहे. अतिवृष्टीचा फटका पंजाबलाही बसला. मात्र, पंजाब सरकारने लगेचच शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली.

महाराष्ट्रात मात्र १८ हजार ५०० रुपयांची मदत जाहीर केली.आर्थिक दृष्ट्या पुढारलेल्या महाराष्ट्राने पंजाब इतकी मदत शेतकऱ्यांना का करू नये? छत्तीसगड,नागालँड व झारखंड या दरिद्र्य ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या नंतर महाराष्ट्राचा नंबर लागतो.

## दुरुस्तीच्या कामामुळे चांदणी कुऱ्हे रेल्वे अंडरपास बोगदा पाच दिवस राहणार बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यातील चांदणी कुऱ्हे येथील रेल्वे अंडरपास बोगद्याच्या दुरुस्तीचे काम बुधवार, दि. १५ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबरपर्यंत बंद राहणार आहे. अपघाताचा धोका टाळण्यासाठी या बोगद्यातून वाहतूक बंद राहील, अशी माहिती वरिष्ठ अभियंता पंकज हाडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. पत्रकात म्हटले आहे, की पावसामुळे चांदणी कुऱ्हेचा अंडरपास बोगदा खराब झाला आहे. बोगद्यात खड्डे पडले आहेत. या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे अंडरपास बोगद्यातील वाहतूक थांबविण्यात आली आहे. नदीकडिल मोठ्या पुलाखालून वाहतूक वळवण्यात आली आहे.




# आशेचा दीप घेऊन 'एचआयव्ही'बाधितांच्या जीवनातील अंधार दूर करा : डॉ. डिगंबर महाले

## आधार संस्था, रोटरी क्लबतर्फे प्रोटीन किटचे वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संवेदनशील कार्यातून मानवतेचा दीप प्रज्वलित होत असतो. हा दीप घेऊन एचआयव्हीबाधितांसह समाजातील सर्वच वंचित घटकांच्या आयुष्यातील अंधार दूर करता येणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी समाजातील प्रगत घटकांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. प्रत्येकाने पणती होण्याचा प्रयत्न केला तरी सर्वांचा एकत्रित मिळून मोठा उजेड रंजल्या- गांजल्यांच्या जीवनात कायमस्वरुपी दिवाळीची रोषणाई निर्माण करू शकतो, असे प्रतिपादन श्री मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी केले. येथील रोटरी क्लब व आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे मंगळवार, दि. १४ रोजी सकाळी झालेल्या प्रोटीन किटवाटप कार्यक्रमप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी व सचिव महेंद्र पाटील सत्कारार्थी होते.

डॉ. महाले पुढे म्हणाले, की अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर उमटणारे हसू हीच खरी दिवाळी होय. समाजाने अशा उपक्रमांतून पुढे यावे. एचआयव्हीबाधितांच्या कुटुंबांच्या जीवनात प्रकाश पसरवावा. आधार संस्था ही एचआयव्हीबाधितांसाठी खरोखर एक आधारच आहे. रोटरी क्लबचे समाजपयोगी उपक्रमही कौतुकास्पद आहेत. मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे गरजूंना सर्वतोपरी सहकार्य नेहमीच मिळत राहील. डॉ. संदीप जोशी, श्री. भूषण बिर्ला यांनीही यावेळी मोगत व्यक्त केले. प्रतिक जैन यांनी अंकुल सेवा सेतू प्रकल्पाची माहिती दिली. श्री. देवेंद्र कोठारी व सौ. रेणू प्रसाद यांनी डॉ. डिगंबर महाले यांचे स्वागत केले.

पान ३ वर

# श्रमदानातून साकारला उदयनगर येथे वनराई बंधारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर तालुक्यातील उदयनगर येथे समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या मार्गदर्शनाने श्रमदानातून वनराई बंधारा साकारण्यात आला आहे. लोकसहभागातून हा बंधारा साकारल्याने तालुक्यात कौतुक होत आहे. हा बंधारा सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी पूर्णत्वास आला.

उपक्रमासाठी गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, लोकनियुक्त सरपंच प्रकाश वाघ, उपसरपंच राकेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पाटील, सुदाम सोनवणे, ग्रामपंचायत अधिकारी सोनी पाटील, तसेच गावातील विविध स्वयंसेवी संस्था व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन परशुराम पाटील, माजी सरपंच देविदास खैरनार, सामाजिक कार्यकर्ते राजेश वाघ, जितेंद्र पाटील, भास्कर कापडणे, राजेंद्र पुंडलिक पाटील, किशोर चव्हाण, सुभाष पाटील, तलाठी दीपक पाटील, कृषी सहाय्यक रोहिदास भामरे, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एच. एस. पाटील व शिक्षक वृंद, मराठी शाळेचे मुख्याध्यापक मासुळे, शिक्षक वृंद, रोजगार सेवक सागर सोनवणे, शिपाई राकेश कापडणे, अंगणवाडीसेविका, मदतनीस, आशा वर्कर, तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. श्रमदानानंतर 'स्वच्छतेचा वार सोमवार' या संकल्पनेतून गावात स्वच्छता मोहीम देखील राबविण्यात आली.

# युवारंग युवक महोत्सवात 'प्रताप'च्या विद्यार्थ्यांचा डंका

## एकूण २६ पदके पटकावून शिरपेचात रोवला मानाचा तुरा !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव आयोजित युवारंग युवक महोत्सवात घवघवीत यश संपादन केले. कलात्मक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाने नृत्यकलेची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावत सांस्कृतिक वर्चस्व सिद्ध केले आहे. एकूण ५ पारितोषिके होती. यात २६ विविध पदके (सुवर्ण, रौप्य व कांस्य) विद्यार्थ्यांनी पटकावली आहेत.

विजयानंतर महोत्सवात नृत्यकलेची चॅम्पियनशिप ट्रॉफी बहाल करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्यासाठी खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक, उपाध्यक्ष जितेंद्र देशमुख, श्रीमती माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, कार्याध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी, कार्योपाध्यक्ष सीए नीरज अग्रवाल, ज्येष्ठ संचालक हरी वाणी, योगेश मुंदडे, विनोद पाटील, प्रदीप अग्रवाल, कल्याण पाटील, चिटणीस प्रा.पराग पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. हर्षवर्धन जाधव, प्राध्यापक प्रतिनिधी दिनेश भलकार, कुलसचिव राकेश निळे, वरिष्ठ लिपिक भटू चौधरी, देवेंद्र कांबळे आदी आवर्जून उपस्थित होते. दरम्यान, सर्व उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

स्पर्धेत सिनेट सदस्य डॉ. संदीप नेरकर, सांस्कृतिक प्रमुख डॉ. योगेश तोरवणे, प्रा. नितीन पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. तुषार रजाळे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी तथा संघ व्यवस्थापक डॉ. रवी बाळसकर, महिला संघ व्यवस्थापक डॉ. नलिनी पाटील, सहाय्यक महिला विकास अधिकारी डॉ. वंदना भामरे, प्रा. दिलीप तडवी आदींनी सहकार्य केले.



### अशी आहेत पारितोषिके.....

प्रहसन (नाट्य प्रकार) प्रथम क्रमांक (६ सुवर्णपदके)
समूह नृत्य (फोक डान्स) प्रथम क्रमांक (१० सुवर्णपदके)
रांगोळी स्पर्धा प्रथम क्रमांक (१ सुवर्णपदक)
लोकसंगीत स्पर्धा द्वितीय क्रमांक (८ रौप्यपदके)
कोलाज (चिकटकला) तृतीय क्रमांक (१ कांस्यपदक)

### सरावाच्या काळात अक्षरच्या आईचे निधन

महाविद्यालयाच्या प्रहसन संघातील अक्षर ठाकरे या विद्यार्थ्याच्या आईचे सरावाच्या काळात अपघाती निधन झाले होते. तरीही अक्षरने दुःख मनातल्या मनात ठेवले. ध्येय व दृढनिश्चय त्याने सोडला नाही. संपूर्ण टीमसह आपले सादरीकरण करून विजय मिळविलवा. सुवर्णपदक पटकावत त्याने आईला अनोखी श्रद्धांजलीच अर्पण केली आहे.



# जागतिक विद्यार्थी दिन
# तरुणाईच्या स्वप्नांना पंख देणारा दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात जागतिक विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य म्हणजे भारताचे माजी राष्ट्रपती, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थ्यांचे आदर्श मार्गदर्शक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन.
डॉ. कलाम यांनी आयुष्यभर विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, विचार आणि स्वप्नांची ज्योत चेतवली. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने त्यांच्या जन्मदिवसाला विद्यार्थ्यांसाठी अर्पण केलेला दिवस म्हणून मान्यता दिली.

### डॉ. कलाम : विद्यार्थ्यांचा खरा प्रेरणास्रोत

डॉ. कलाम हे फक्त भारताचे राष्ट्रपती नव्हते, तर ते विद्यार्थ्यांचे ‘ राष्ट्रगुरू ’ होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व हे साधेपण, प्रामाणिकपणा आणि ज्ञानाचा संगम होते. त्यांनी नेहमी सांगितले, की स्वप्न ते नव्हे जे आपण झोपेत पाहतो, तर ते जे आपल्याला झोपू देत नाहीत. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षांसाठी नव्हे, तर जीवनासाठी शिक्षण घ्यावे, हे त्यांचे तत्त्वज्ञान होते. त्यांच्या प्रत्येक भाषणात विद्यार्थ्यांसाठी आशेचा आणि आत्मविश्वासाचा संदेश दडलेला असे.

### विद्यार्थी समाज परिवर्तनाचे केंद्र

विद्यार्थी हे कोणत्याही राष्ट्राचे भविष्य असतात. त्यांच्यातील ऊर्जा, कल्पकता आणि नवनिर्मितीची क्षमता देशाला पुढे नेते. पण शिक्षण हे फक्त गुण मिळविण्याचे साधन नसून, ते मानवतेचे संस्कार केंद्र असले पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी केवळ यशाच्या शर्यतीत धावताना चारित्र्य, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव विसरतात.जागतिक विद्यार्थी दिन आपल्याला या संतुलनाची आठवण करून देतो.

आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोरची आव्हाने आजचा विद्यार्थी डिजिटल युगात जगतो. इंटरनेटच्या महासागरात ज्ञानाचा खजिना आहे, पण त्याचबरोबर भ्रम आणि व्यसनांचे वादळही आहे. अभ्यासाचा ताण, करिअरची अनिश्चितता, आणि समाजमाध्यमांचा दबाव हे सगळे विद्यार्थ्यांच्या मन:शांतीवर परिणाम करतात.
अशा वेळी शिक्षक, पालक आणि समाज यांची जबाबदारी आहे की त्यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आधार, योग्य दिशा आणि आत्मविश्वास द्यावा.

### विद्यार्थी दिनाचा खरा अर्थ

जागतिक विद्यार्थी दिन हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर नव्या विचारांचा शपथदिन आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने या दिवशी स्वत:ला विचारावे, की मी समाजासाठी काय निर्माण करू शकतो? कारण खरे शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळवणे नव्हे, तर ते समाजासाठी वापरणे.
डॉ. कलाम म्हणायचे, की शिक्षण हे मनुष्याला सशक्त बनवते. सशक्त मनुष्यच सशक्त राष्ट्र निर्माण करू शकतो.

**समारोप :** आजचा दिवस प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. पुस्तकांच्या पलीकडे पाहून स्वप्नांचा, सर्जनशीलतेचा आणि मानवतेचा प्रकाश स्वत:त निर्माण करा. कारण भविष्यातील भारत तुमच्याच डोळ्यांतून, विचारांतून आणि कृतीतून घडणार आहे. स्वप्न बाळगा, परिश्रम करा, आणि जगाला दाखवा, की विद्यार्थी म्हणजे केवळ शिकणारा नाही, तर समाजाला दिशा देणारा दीप आहे..

### डॉ. कलाम : स्वप्नवत राष्ट्रनिर्मितीचा शिल्पकार

भारताच्या आधुनिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, की ज्यांनी विज्ञान, शिक्षण आणि मूल्यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवीन दिशा दिली. त्यापैकी एक तेजस्वी नाव म्हणजे भारताचे ‘ मिसाईल मॅन ’ आणि ‘ जनतेचे राष्ट्रपती ’ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तमिळनाडूतील रामेश्वरम या छोट्याशा गावात झाला. गरीब मुस्लिम कुटुंबात जन्मलेला हा मुलगा पुढे भारताचा सर्वोच्च नागरिक होईल, हे त्या काळात कोणालाही वाटले नसते. मात्र त्यांच्या जिद्दीने, मेहनतीने आणि अटळ देशभक्तीने हे शक्य झाले.

### विज्ञान आणि राष्ट्रप्रेमाचा संगम

डॉ. कलाम यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून अभियांत्रिकी शिक्षण घेतले आणि नंतर डीआरडीओ आणि इस्त्रोमध्ये सामील झाले. भारतातील पहिल्या उपग्रह प्रक्षेपण कार्यक्रमात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. १९९८ मध्ये झालेल्या पोखरण अणुचाचणी ही त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी ठरली. त्यामुळे भारत जागतिक स्तरावर अणुशक्ती संपन्न राष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांना ‘ भारताचे मिसाईल मॅन’ हे बिरुद याच कामगिरीमुळे मिळाले. पण विज्ञान त्यांच्यादृष्टीने केवळ तांत्रिक साधन नव्हते. ते राष्ट्रनिर्मितीचे माध्यम होते. त्यांनी नेहमी सांगितले , की विज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे मानवी जीवनाचा दर्जा उंचावणे.

### विद्यार्थ्यांचा राष्ट्रपती

२००२ मध्ये ते भारताचे ११ वे राष्ट्रपती झाले.त्यांची राष्ट्रपतीपदाची कार्यपद्धती इतरांपेक्षा वेगळी होती. ते राष्ट्रपती भवनातून बाहेर पडून विद्यार्थ्यांमध्ये गेले.त्यांचे प्रत्येक भाषण हे प्रेरणादायी असायचे विशेषत: तरुणांसाठी. त्यांना ‘ जनतेचे राष्ट्रपती ’ म्हणणे हे केवळ सन्मान नव्हते, तर लोकांच्या प्रेमाची साक्ष होती. ते नेहमी म्हणायचे, की Teacher should be the best mind in the country. **आणि** Dream, dream, dream Dreams transform into thoughts and thoughts result into action.

### जीवनाचे तत्त्वज्ञान :

स्वप्न, शिस्त आणि सेवा डॉ. कलाम यांचे जीवन तीन शब्दांत सांगता येईल. स्वप्न, शिस्त आणि सेवा. त्यांनी स्वत:साठी कधी काही मागितले नाही. नेहमी विद्यार्थ्यांमध्ये, तरुणांमध्येच आनंद शोधला. त्यांचे संपूर्ण जीवन हे भारतीय तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहे. २०१५ मध्ये IIM शिलाँग येथे व्याख्यान देताना व्यासपीठावरच त्यांचा मृत्यू झाला, तेही विद्यार्थ्यांशी बोलताना. हा शेवट त्यांच्या संपूर्ण आयुष्याचे सार सांगतो.
डॉ. कलाम यांचे विचार आजही प्रत्येक भारतीय तरुणासाठी मार्गदर्शक आहेत. त्यांनी शिकवले, की यशासाठी बुद्धिमत्ता नव्हे, तर विश्वास आणि मेहनत आवश्यक आहे.
त्यांचा संदेश साधा पण गूढ होता.
“You have to dream before your dreams can come true.”
डॉ. कलाम हे फक्त राष्ट्रपती नव्हते, तर राष्ट्राचा विचार करणारे गुरू होते. त्यांच्या विचारांमध्ये विज्ञान होते. मात्र त्यांच्या हृदयात मानवता होती. आजही त्यांचे शब्द प्रत्येक भारतीयाच्या मनात घुमतात. भारताचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडते.



# गॅस सिलिंडर सबसिडी बँक खात्यात जमा; घरबसल्या तपासा आणि प्रक्रिया जाणा

## गॅस सिलिंडर सबसिडी यादी : आधार लिंक करून सबसिडी कशी मिळवावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एलपीजी गॅस सिलिंडरची सबसिडी घेत आहात. आपणासाठी ही अतिशय महत्त्वपूर्ण माहिती आहे. अनेक ग्राहकांना सबसिडी अचानक बंद होते. याचे मुख्य कारण आधार कार्ड गॅस कनेक्शनला लिंक नसणे असते. मात्र आता काळजी करण्याची गरज नाही. मोबाईल किंवा कॉम्प्युटरवरून सोप्या पद्धतीने आधार लिंक करून सबसिडी पुन्हा सुरू करू शकतात. यासंदर्भातील संपूर्ण प्रक्रिया खालीलप्रमाणे :

**गॅस सबसिडी म्हणजे काय? ती कोणाला मिळते?**
केंद्र सरकार पात्र ग्राहकांना गॅस सिलिंडर खरेदीवर आर्थिक मदत देते. यालाच गॅस सबसिडी म्हणतात. ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण डीबीटीद्वारे आधारशी जोडलेल्या बँक खात्यात जमा होते.
पात्रता : ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १० लाख रुपयांपेक्षा कमी असेल त्यांनाच सबसिडी मिळते. सबसिडीच्या रकमेत आंतरराष्ट्रीय इंधन दर आणि सरकारी नियमांनुसार बदल होत असतो.

**सबसिडी बंद केव्हा होते ?**
गॅस कनेक्शनला आधार कार्ड लिंक नसल्यास सबसिडी थांबते. त्यासाठी आधार लिंकिंग अनिवार्य आहे. जेणेकरून फसवणूक टाळता येईल. सबसिडी योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचेल.

### ऑफलाईन प्रक्रिया

ऑनलाईनमध्ये अडचण असल्यास जवळच्या गॅस वितरक कार्यालयात जा. आधार कार्डची प्रत आणि गॅस कनेक्शन डिटेल्स द्या. आधार लिंक करण्याची विनंती करा. या दोन्ही पद्धतींनी आधार लिंक करून सबसिडीचा लाभ घेऊ शकता.

### घरबसल्या आधार लिंकची ऑनलाइन प्रक्रिया पुढीलप्रमाणे :

**घरबसल्या आधार लिंक करण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा.**

१) UIDAI च्या अधिकृत वेबसाइटवर जा : [uidai.gov.in](https://uidai.gov.in) आणि ‘ Aadhaar Seeding ’ सेक्शनमध्ये LPG पर्याय निवडा (संदर्भ : uidai.gov.in/seeding/User/ResidentSelf-Seedingpds.aspx किंवा समान पोर्टल).
२) ‘ बेनिफिट टाइप ’मध्ये LPG निवडा.
३) तुमची गॅस कंपनी (इंडेन, भारत गॅस किंवा HP गॅस) निवडा.
४) वितरकाचे नाव आणि ग्राहक क्रमांक एंटर करा.
५) मोबाईल नंबर, ई-मेल आयडी आणि आधार नंबर भरा, ‘ Submit ’ करा.
६) मोबाईलवर आलेल्या OTP ने व्हेरिफाय करा.
प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कन्फर्मेशन मेसेज मिळेल आणि सबसिडी पुन्हा सुरू होईल.

### सबसिडी जमा झाली की नाही हे कसे तपासावे?

- गॅस कंपनीच्या अधिकृत MyLPG पोर्टलवर (mylpg.in) जा आणि ‘ सबसिडी स्टेटस ’ चेक करा. आधार लिंक बँक खात्यात DBT ट्रान्झेक्शन तपासा किंवा पासबुक पाहा. हेल्पलाईन : 18002333555 वर कॉल करा.
(टीप : आधार आणि बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत वेबसाइट्सचा वापर करा.)

# किसान का बेटा बना आयपीएस अधिकारी

## दसवीं में फेल से यूपीएससी में तीन बार सफलता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हार तब होती है जब इसे मान लिया जाता है, जीत तब होती है जब ठान लिया जाता है...। शकील आज़मी की यह मशहूर पंक्ति राजस्थान के भीलवाड़ा के ईश्वर लाल गुर्जर की जिंदगी पर पूरी तरह फिट बैठती है।
कभी दसवीं कक्षा में फेल होने वाला यह युवा आज भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) का अधिकारी है। उनकी कहानी लाखों युवाओं के लिए प्रेरणा है, जो असफलताओं से हार मान लेते हैं।
ईश्वर लाल गुर्जर की कहानी आयपीएस मनोज शर्मा से मिलती-जुलती है, जिनकी जिंदगी पर बनी फिल्म बारावी फेलने देशभर के युवाओं को प्रेरित किया। ईश्वर भी दसवीं में फेल होने के बाद पढ़ाई छोड़ने का मन बना चुके थे, लेकिन उनके पिता, जो एक किसान थे, ने उन्हें समझाया कि असफलता से हार मानना सही नहीं।

**पिता की यह सलाह**

पिता की यह सलाह उनके जीवन का टर्निंग पॉइंट बनी। दसवीं में फेल होने के बाद ईश्वर ने दोबारा मेहनत की और ५४ गुना अंकों के साथ दसवीं पास की। फिर बारावीं में ६८ गुना अंक हासिल किए। उच्च शिक्षा के लिए उन्होंने महर्षि दयानंद यूनिवर्सिटी, अजमेर से प्राइवेट छात्र के रूप में बी.ए. की डिग्री हासिल की और साथ ही प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी शुरू की।रास्ता आसान नहीं था। ईश्वर राजस्थान की वनरक्षक, पटवारी और जेल प्रहरी जैसी परीक्षाओं में असफल रहे। २०१८ में आरएएस मेन्स में भी उन्हें असफलता मिली। यूपीएससी परीक्षा में भी तीन साल तक लगातार असफलताएं झेलनी पड़ीं २०१९ में प्रीलिम्स, २०२० में इंटरव्यू और २०२१ में फिर से असफलता।

**हार नहीं मानी**

लेकिन ईश्वर ने हार नहीं मानी। २०१९ में उन्होंने आरईईटी परीक्षा पास कर थर्ड ग्रेड टीचर की नौकरी हासिल की। २०२१ में राजस्थान पुलिस में सब-इंस्पेक्टर बने और उसी साल आरएएस परीक्षा पास कर एसडीएम के पद तक पहुंचे। यूपीएससी में २०२२ में एआयआर ६४४ के साथ आयआरएस अधिकारी बने। २०२३ में एआयआर ५५५ के साथ आयपीएस बनकर उन्होंने नई ऊंचाइयों को छुआ। इतना ही नहीं, २०२४ में उन्होंने फिर से यूपीएससी पास किया और एआयआर ४८३ हासिल की।

**हिंदी मीडियम से की पढ़ाई**

हिंदी मीडियम से पढ़ाई करने वाले ईश्वर ने यूपीएससी जैसी कठिन परीक्षा को तीन बार पास कर असंभव को संभव कर दिखाया। उनका यह सफर उन युवाओं के लिए प्रेरणा है जो असफलताओं से डरकर अपने सपनों को छोड़ देते हैं।
ईश्वर की कहानी सिखाती है कि हालात चाहे जैसे हों, अगर हौसला बुलंद हो और मेहनत जारी रहे, तो कोई भी मंजिल असंभव नहीं। आज वह आयपीएस अधिकारी हैं, लेकिन उनका सफर उस बिंदु से शुरू हुआ था, जहां असफलता अक्सर लोगों को तोड़ देती है।



# जागतिक अंध दिन : प्रकाशाचा हक्क प्रत्येक डोळ्याचा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ऑक्टोबर मधील दुसऱ्या गुरुवारी ‘ जागतिक अंध दिन ’ साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट आहे, की डोळ्यांच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करणे. प्रत्येकाला दृष्टीचा हक्क मिळवून देणे. आजच्या आधुनिक जगात आपण विज्ञान, वैद्यकशास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने प्रगतीकडे पाहतो. पण अजूनही जगभरात लाखो लोक अंधत्वाच्या सावलीत जगत आहेत.जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) आकडेवारीनुसार जगातील सुमारे २८ कोटींहून अधिक लोकांना दृष्टीदोष आहे. त्यातील अनेकांचे अंधत्व हे टाळता येण्यासारखे आहे. हे वास्तव चिंताजनक आहे.

### दृष्टीचा अभाव म्हणजे केवळ अंधत्व नव्हे

अंधत्व हा फक्त डोळ्यांचा प्रश्न नसून तो सामाजिक आणि आर्थिक असमानतेचाही आरसा आहे. दृष्टी हरवलेल्या व्यक्तींचे जीवन केवळ काळोखात नसते, तर त्यांच्या आत्मविश्वास, शिक्षण, रोजगार आणि सन्मानावरही परिणाम होतो. विशेषत: गरीब आणि ग्रामीण भागात योग्य वैद्यकीय सुविधा, तपासणी आणि उपचार न मिळाल्यामुळे अनेक लोक कायमचे दृष्टिहीन होतात.

### प्रतिबंध उपचारापेक्षा अधिक महत्त्वाचा

अनेक वेळा डोळ्यांचे आजार जसे की मोतीबिंदू, ग्लूकोमा, डायबेटिक रेटिनोपथी हे सुरुवातीच्या टप्प्यात ओळखले गेले असते तर सहज बरे होऊ शकतात. परंतु दुर्लक्ष, अज्ञान आणि आर्थिक अडचणींमुळे ते गंभीर अवस्थेत पोहोचतात. म्हणूनच नियमित नेत्रतपासणी, पौष्टिक आहार, सूर्यप्रकाशापासून योग्य संरक्षण, आणि मोबाईलस्क्रीनचा मर्यादित वापर ही सवय प्रत्येकाने अंगी बाळगणे अत्यावश्यक आहे.

### सामाजिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची

अंध व्यक्तींना फक्त सहानुभूती नव्हे, तर संधीची समानता मिळाली पाहिजे.शिक्षण संस्थांमध्ये ‘ ब्रेल ’ प्रणालीचा वापर वाढविणे, सार्वजनिक ठिकाणी सुलभ मार्गदर्शक सुविधा उपलब्ध करणे, आणि रोजगारात आरक्षण व सहाय्य ही खरी समाजसेवा आहे. अंधत्व दूर करणे म्हणजे केवळ नेत्ररोगावर उपचार नव्हे, तर दृष्टीच्या माध्यमातून मानवतेचा सन्मान पुन्हा प्रस्थापित करणे आहे.

### ‘ लव्ह युवर आइज ’ डोळ्यांवर प्रेम करा

यावर्षीचा जागतिक अंध दिनाचा संदेश आहे ‘ लव्ह युवर आइज ’ म्हणजेच आपल्या डोळ्यांवर प्रेम करा. याचा अर्थ केवळ स्वत:ची काळजी घेणे नव्हे, तर आपल्या आसपासच्या लोकांचीही काळजी घेणे. आपल्या पालकांना, मुलांना, शाळकरी विद्यार्थ्यांना व ज्येष्ठ नागरिकांना दरवर्षी एकदा नेत्रतपासणीसाठी घेऊन जाणे ही आपली नागरी जबाबदारी ठरावी.

### शेवटचा विचार

जागतिक अंध दिन आपल्याला सांगतो, की अंधार दूर करण्यासाठी केवळ दिवा लावू नका, दृष्टी वाचवा. एका व्यक्तीचे डोळे वाचवले म्हणजे एका आयुष्याला पुन्हा प्रकाश मिळवून दिला. डोळ्यांची काळजी घेणे हे केवळ वैयक्तिक आरोग्य नव्हे, तर मानवतेचे ऋण फेडण्याचा मार्ग आहे.



### भारतीय अंध व्यक्तीची नेत्रदीपक कामगिरी

**डॉ. येसुदासन जॉर्ज :**
पहिला अंध आएएस अधिकारीजन्मत: दृष्टिहीन असूनही अपार जिद्दीने शिक्षण घेतले. १९७७ मध्ये ते भारताचे पहिले अंध आयएएस अधिकारी झाले. त्यांनी प्रशासन क्षेत्रात अपंग व्यक्तींसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या.

**संगीता काळा :**
संगीतविश्वातील देदीप्यमान सूर जन्मत: दृष्टिहीन. मात्र अत्यंत सुरेल आवाजाच्या बळावर त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये नाव कमावले. अनेक पुरस्कार व सन्मानांनी गौरविले गेले. संगीत हे केवळ कला नव्हे, तर दृष्टीपलीकडचा प्रकाश आहे, हे त्यांनी सिद्ध केले.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# छोट्या गावातून, छोट्या शाळेतून, मातृभाषेत शिक्षण घेऊन मोठे होता येते...!

## हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत शिंदेंच्या हृदयस्पर्शी प्रवासातून झालेय सिद्ध ...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**मोठे शिक्षण घेऊन मोठे होण्यासाठी मोठ्या गावाच्या मोठ्या शाळेतच शिकले पाहिजे. तेही इंग्लिश मिडियममधूनच शिकले पाहिजे. तरच आयुष्यात काही तरी साध्य करता येते. उत्तम करिअर घडविता येते हा अनेकांचा मोठा भ्रम दूर करण्याचे काम डॉ. प्रशांतदादा शिंदे यांनी करून दाखविले आहे. तालुक्यातील बोरगाव या छोट्याशा गावातून शिक्षणाचा श्रीगणेशा करून डी.एन.बी.ची डिग्री गोल्ड मेडलसह प्राप्त केलेले डॉ. प्रशांतदादा अनेकांसाठी जणू प्रेरणादायीच आहेत.**

हल्ली मुलाची बौद्धीक क्षमता असो अथवा नसो त्याला कॉन्व्हेंट किंवा इंग्लिश मिडियम स्कूलमध्येच दाखल करायचे. तरच त्याचे करिअर उत्तम घडू शकते. तो फाडफाड इंग्रजी बोलू शकतो. हा प्रचलित गैरसमज डॉ. प्रशांतदादा यांच्या रुपाने दूर झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकूनही ते आज अस्खलित इंग्रजी बोलतात. एम. बी. बी. एस. आणि डी. एन. बी.चा सर्व अभ्यासक्रम इंग्रजीतून आहे. मात्र, या परीक्षांमध्ये त्यांनी नेत्रदीपक यश मिळविले आहे. माझा मुलगा कॉन्व्हेंट स्कुल किंवा इंग्लिश मिडियममध्ये शिकतो असे सांगताना अनेक पालकांना ही बाब प्रतिष्ठेची वाटते. मात्र, डॉ. प्रशांतदादा यांचे शिक्षक असलेले वडिल स्व. दिलीपराव शिंदे यांना त्यांचा मुलगा जरी मराठी माध्यमातून शिकत असला, तरी त्यात काही गैर वाटले नाही. आपला मुलगा मातृभाषेत शिकुनही इंग्रजी भाषेतील सर्व अभ्यासक्रमांमध्ये उत्तम गुणवत्ता प्राप्त करू शकेल हा त्यांना असलेला दृढ विश्वास डॉ. प्रशांतदादा यांनी सार्थ करून दाखविला आहे.

प्रत्येक गावात अनेक उच्चशिक्षित आहेत. हे सारेच कॉन्व्हेंट स्कुल किंवा इंग्लिश मिडियममधून शिकलेले नाहीत. अनेक जण तर शासकीय होस्टेलमध्ये खान-पान व राहण्याच्या सोयीची दैना असतानाही उच्चशिक्षित झाले आहेत. बौद्धीक क्षमता नसतानाही कोवळ्या वयात अवजड अभ्यास आणि जीवघेणी स्पर्धा व इर्षा याला काही बालके निव्वळ पालकांच्या हट्टापायी बळी पडत आहेत. बालकांचे खेळणे- कुदणेच नव्हे तर त्यांचे बालपणही दप्तराच्या ओझ्याखाली दाबले जात आहे. असे न करताही आपला मुलगा किंवा मुलगी जीवनात यशस्वी होऊ शकते याचेच उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. प्रशांतदादा होय. ते डॉक्टर म्हणून किती मोठे व सोज्वळ आहेत यापेक्षाही कोणत्या परिस्थितीतून त्यांनी वैद्यकीय शिक्षणात नेत्रदीपक यश मिळविले हे अधिक महत्वाचे आहे. अमळनेर शहरात त्यांच्या साईसेवा हॉस्पिटलच्या माध्यमातून ते करीत असलेली रुग्णसेवा आणि त्यांचा विद्यार्थीदशा ते डॉक्टर होईपर्यंतचा जीवनप्रवास खऱ्या अर्थाने हृदयस्पर्शी व प्रेरणादायी आहे.

### डॉ. शिंदेंच्या घराण्याची परंपरा

डॉ. प्रशांतदादा यांचे वडिल स्व. दिलीप शामराव शिंदे हे एम.ए., बी.एड. पदवीधर होते. तालुक्यातील मारवड येथील सु. ही. मुंदडा हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून ते रुजू झाले होते. त्यानंतर उपमुख्याध्यापक म्हणून ते सेवा निवृत्त झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. डॉ. प्रशांतदादा यांच्या मातोश्री श्रीमती सुनंदाताई शिंदे या शिक्षण क्षेत्रातील प्रगल्भ व्यक्तिमत्त्व आहेत. शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावून त्याही सेवा निवृत्त झाल्या. त्यामुळेच शिक्षण, संस्कार आणि समाजसेवेची बीजे लहानपणापासूनच डॉ. प्रशांतदादा यांच्या मनात रुजली.




### डीएनबी परीक्षा कठीणतम टप्पा

डॉ. प्रशांतदादा यांनी पुढे धुळे येथील हिरे मेडिकल कॉलेजमध्ये असिस्टंट लेक्चरर म्हणून काम केले. हे करत असतानाच कलकत्ता येथे डीएनबी मेडिसिनसाठी प्रवेश घेतला. त्या काळात डीएनबी परीक्षा ही देशातील सर्वात कठीण वैद्यकीय परीक्षा मानली जात होती. यावेळी निकालही अत्यंत टफ होता. शंभर विद्यार्थ्यांपैकी फक्त दहा जणच उत्तीर्ण झाले होते. त्यात डॉ. शिंदे यांनी गोल्ड मेडल पटकावून त्यांची गुणवत्ता सिद्ध केली.

### शैक्षणिक वाटचाल

*डॉ. प्रशांतदादा यांचे प्राथमिक शिक्षण बोरगाव येथे झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी मारवड येथील सु. ही. मुंदडा हायस्कूलमध्ये पूर्ण केले. त्यानंतर बोरगाव- मारवड व अमळनेर असा प्रवास करत त्यांनी अमळनेरच्या महाविद्यालयात बारावी विज्ञान पूर्ण केले. विशेष म्हणजे ते बारावीला महाविद्यालयात द्वितीय होते. वैद्यकीय शिक्षणात त्या काळात फ्रि-शिट शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेणारे ते त्या बॅचमधील पहिले विद्यार्थी ठरले. त्यांनी एमबीबीएससाठी त्यांचा कोल्हापूर गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये नंबर लागला होता. मात्र, अधिक चांगल्या संधींचा शोध घेत त्यांनी प्रवरानगरच्या टॉप मोस्ट कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांना सुरुवातीला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र, चिकाटी, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी अभ्यासात नेहमी अव्वल स्थान पटकावले.शिर्डी संस्थानच्या रुग्णालयात त्यांनी इंटर्नशिप पूर्ण केली. त्यानंतर पातोंडा आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून ते नियुक्त झाले. ग्रामीण भागातील रुग्णसेवेचा हा अनुभव त्यांना खूप उपयुक्त ठरला. याच काळात आरोग्यसेवा म्हणजेच समाजसेवा याची प्रत्यक्षात जाणीव त्यांच्या मनात बिंबली.*

### साईसेवा हॉस्पिटल

डीएनबी पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी पुण्यातील आदित्य बिर्ला क्रिटिकल केअर सेंटर आणि धुळे येथील संजिवन हॉस्पिटलमध्ये कामाचा अमूल्य अनुभव घेतला. नोव्हेंबर २०१२ मध्ये ते अमळनेरला परतले. डॉ. जयेश शिंदे यांच्या सुखांजनी हॉस्पिटलमध्ये त्यांनी सेवा देण्यास सुरुवात केली. त्याच काळात समाजासाठी काहीतरी करावे, अशी इच्छा त्यांनी मनाशी बाळगली. अखेर २० ऑगस्ट २०१५ रोजी त्यांनी साईसेवा हॉस्पिटलच्या माध्यमातून स्वतंत्रपणे वैद्यकीय सेवेची मुहूर्तमेढ रोवली. अत्याधुनिक सुविधा, कुशल टीम आणि रुग्णकेंद्री दृष्टीकोन यामुळे अल्पावधीतच साईसेवा हॉस्पिटलने जनतेचा विश्वास संपादन केला.

### पत्नी डॉ. प्रियांका शिंदेंची मोलाची साथ

डॉ. प्रशांतदादा यांचा २०१२ मध्ये डॉ. प्रियांका यांच्याशी विवाह झाला. डॉ. प्रियांका शिंदे याही एमबीबीएस होत्या. त्यांचे मुल एक वर्षाचे असतानाही डॉ. प्रियांका यांनी पुण्यात ईएनटी स्पेशलायझेशन पूर्ण केले. दोघांनी मिळून दर्जेदार रुग्णसेवेचा ध्यास घेतला. त्यानंतर २०१८ मध्ये डॉ. प्रियांका शिंदे यांचेही हॉस्पिटल झाले. डॉ. प्रशांत शिंदे यांच्या यशात त्यांचा सिंहावा वाटा आहे.

### सामाजिक बांधिलकी, नि:स्वार्थ सेवा

डॉ. शिंदे यांचे सामाजिक कार्य खूप प्रभावी आहे. मराठा समाजाच्या वैद्यकीय सेलचे ते जिल्हाध्यक्षही आहेत. अनेक गरजू रुग्णांना मोफत तपासणी, औषधोपचार, आणि गंभीर परिस्थितीत आर्थिक मदतही ते करतात. आठ ते दहा विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक खर्चही ते स्वतः उचलतात. गेल्या पाच वर्षांपासून ग्रामीण रुग्णालयाच्या एचआयव्ही विभागाचे चीफ ऑफिसर म्हणून ते कार्यरत आहेत. पूर्वी अमळनेरमध्ये असलेल्या प्रताप चॅरिटेबल हॉस्पिटलप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांसाठी आधुनिक, परवडणारे आणि सुसज्ज रुग्णालय उभारण्याचे स्वप्न ते पाहत आहेत.

## प्रभाग १८मधील काही मतदारांची नावे चुकून इतर प्रभागात समाविष्ट

### विनोद लांबोळे यांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागनिहाय मतदारयादी जाहीर झाली आहे. मात्र, यात प्रभाग क्र. १८ मधील काही मतदारांची नावे चुकीने इतर प्रभागांमध्ये समाविष्ट झाली आहेत. याबाबत माजी उपनगराध्यक्ष विनोद लांबोळे यांनी प्रांताधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की पालिकेकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या चतु:सीमा नुसार काही मतदारांची नावे प्रभाग क्र. १८ मध्ये येतात. मात्र, प्रारूप मतदार यादीत त्यांची नावे चुकीने प्रभाग क्र. १२, १३ व १७ मध्ये नोंदविण्यात आली आहेत. याबाबत संबंधित मतदारांची नावे व अनुक्रमांकासह स्वतंत्र यादी जोडली आहे. त्या मतदारांना पुन्हा प्रभाग क्र. १८ मध्ये समाविष्ट करण्यात यावे. ही दुरुस्ती वेळेत न झाल्यास निवडणुकीत या मतदारांची अडचण होईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## तरुणाच्या धाडसाने वृद्धाला ५० हजारांची बॅग मिळाली परत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर येथील बडौदा बँकेतून ५० हजार रुपये काढून घराकडे निघालेल्या एका वृद्धाचा दोन अल्पवयीन मुलांनी बॅग हिसकावून पळ काढण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी पैलाड भागात घडली. हे पाहून एका धाडसी तरुणाने त्यांच्यावर झडप घालून ती बॅग ताब्यात घेतली. वृद्धास ती बॅग परत दिली. एका चोरट्याला पोलिसांच्या स्धानीन केले, तर दुसरा पळून जाण्यात यशस्वी झाला आहे.

पैलाड येथील तुकाराम भोई हे १३ ऑक्टोबर रोजी दुपारी बडोदा बँकेत ५० हजार काढायला गेले होते. मोटरसायकलच्या डिक्कीत त्यांनी पैसे ठेवून ते घराकडे निघाले. दोन मुलांनी एका स्कूटीवर त्यांचा पाठलाग केला. स्कूटीवर बसलेला मुलगा काही अंतरावर थांबला. लहान मुलाला त्याने तुकाराम भोई यांच्याकडे पाठवले. मोटारसायकलच्या डिक्कीतून ते पैसे काढत असताना अल्पवयीन मुलाने त्यांच्या हातातील ५० हजाराची बॅग हिसकावून पळ काढला. तुकाराम भोई यांनी आरडाओरड करताच जवळच असलेल्या रोहित भागवत पाटील याने त्या अल्पवयीन मुलावर झडप घातली. त्याला पकडून त्याच्या हातातील पैशांची बॅग ताब्यात घेतली. त्यानंतर ती त्याने तुकाराम भोई यांना परत केली. हे पाहताच दुसरा मुलगा स्कूटी घेऊन पसार झाला. रोहितने एका चोरट्याला पकडून हवालदार मंगल भोई व विनोद भोई यांना कळवले. दोघांनी त्याला पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्यासमोर हजर केले. श्री. निकम यांनी सखोल विचारपूस केल्यावर त्या बालकाने सांगितले, की आम्ही दोन जण मध्य प्रदेशातून रेल्वेने अमळनेर आलो. दुसऱ्या मुलाने मला स्टेशनवर थांबवून थोड्या वेळानंतर स्कूटी आणली. नंतर आम्ही त्यावर बसून बँकेजवळ गेलो. वृद्धाचा पाठलाग करून पैसे पळवण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी श्री. निकम यांनी दुसऱ्या चोरट्याच्या शोधासाठी विविध ठिकाणी पथक रवाना केले आहे. याबाबत श्री. निकम यांनी सांगितले, की मध्यप्रदेशात बॅग लिफ्टिंग करणारी एक टोळी आहे. ही टोळी अल्पवयीन मुलांचा वापर करतात. नागरिकांनी बँकेतून रक्कम काढून घरी जाताना सावधानता बाळगावी.

### चोरट्यांनी लांबविल्या विद्युत तारा

तालुक्यातील वावडे व पाडसे शिवारातील शेतांमधून १ हजार ५६० मीटर वीज तारा लांबविल्या आहेत. ही घटना शनिवार, दि. ११ व रविवार, दि. १२ दरम्यान घडली. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सांगितले, की तालुक्यातील कळमसरे विद्युत कक्षातील वरिष्ठ तंत्रज्ञ जगदीश शेवाळे यांनी फिर्याद दिली आहे. यात म्हटले आहे, की पाडसे शिवारातून १०२० मीटर लांबीची तसेच वावडे शिवारातून ५४० मीटर लांबीची अशी एकूण ५५ हजार किमतीची अल्युमिनियम धातूची विद्युत तार चोरट्यांनी चोरून नेली. चोरट्याविरुद्ध मारवड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. सहायक फौजदार संजय पाटील तपास करीत आहेत.




### 'एचआयव्ही'बाधितांच्या जीवनातील अंधार दूर करा : डॉ. डिगंबर महाले

पान १ वरून

श्री. आशिष चौधरी व डॉ. सौ. भारती पाटील यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, डॉ. श्रीमती अपर्णा मुठे, सौ. वनश्री अमृतकर, सौ. विशाखा चौधरी, सौ. शिल्पा सिंघवी, अभिजीत भंडारकर, राजेश जैन, रोहित सिंघवी, रोनक संकलेचा, किशोर लुल्ला, वृषभ पारख आदी उपस्थित होते.

दरम्यान, या उपक्रमात मुलांना सकस आहारासाठी प्रोटीन किट, किराणा, दिवाळी फराळ, मिठाई आणि वस्त्र वाटप करण्यात आले. डॉ. डिगंबर महाले यांच्या हस्ते ३३ गरजू बालकांना दरमहा मिळणाऱ्या किराणा किटचे वाटप झाले. ईश्वर सैनानी यांच्या सुपुत्र चि. आदित्य यांच्या वाढदिवसानिमित्त प्रोटीन किट वाटप झाले. स्वादिष्ट नमकीनचे संचालक विजय पाटील आणि नीलेश पाटील यांनी फराळ आणि मिठाईचे वाटप केले. भूषण बिर्ला व सौ. जयश्री बिर्ला यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांना साड्या, पुरुषांनाही ड्रेस वाटप करण्यात आले. डॉ. संदीप जोशी व महेंद्र पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

आधार बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. सौ. अश्विनी भदाणे यांनी सूत्रसंचालन केले. सौ. रेणू प्रसाद यांनी आभार मानले. संजय कापडे (प्रकल्प समन्वयक), पूनम पाटील, राकेश महाजन, मुरलीधर बिरारी, भावना सूर्यवंशी, योगिता पाटील, उर्जीता शिसोदे, दीप्ती शिरसाठ, मोहिनी धनगर, वंदना पावरा यांनी परिश्रम घेतले.



### तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234





# ॥ मंगल ॥ पान

# महामृत्युंजय मंत्र रचना अन् त्याची शक्ती

**ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् । उर्वारुकमिव बंधनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात ।।**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अर्थ :** आम्ही त्रिनेत्रधारी भगवान शिव यांचे पूजन करतो. जे सुगंधित आणि समृद्धी वाढविणारे आहेत. ज्याप्रमाणे काकडीचा वेल फांदीपासून वेगळा होतो त्याचप्रमाणे आम्हाला मृत्यू आणि अमरत्वापासून मुक्त कर.

महामृत्युंजय मंत्राची उत्पत्ती मृकंडू ऋषी, भगवान शिव यांचे परम भक्त, निपुत्रिक असल्याने दुःखी होते. त्यांनी विचार केला, की विश्वाचे नियम बदलणारे महादेव त्यांना संतती देऊ शकतात. त्यांनी कठोर तपस्या केली. भक्ताच्या भक्तीपुढे नतमस्तक होऊन महादेव प्रकट झाले. त्यांनी मृकंडूला पुत्राचे वरदान दिले. त्यानंतर सांगितले, की या वरदानासोबत सुख आणि दुःख दोन्ही येईल. वरदानाने मृकंडूला मार्कंडेय नावाचा तेजस्वी पुत्र प्राप्त झाला. मात्र ज्योतिष्यांनी सांगितले, की मार्कंडेयचे आयुष्य फक्त १६ वर्षांचे असेल. ही बातमी ऐकून मृकंडू आणि त्यांची पत्नी दुःखी झाले. त्यांनी मार्कंडेयला शिवमंत्राची दीक्षा दिली आणि सांगितले, की ज्यांनी तुला जीवन दिले तेच तुझे रक्षण करतील. मार्कंडेयला जेव्हा आपल्या अल्पायुष्याची माहिती मिळाली. तेव्हा त्याने ठरविले, की तो भगवान शिव यांच्याकडून दीर्घायुष्य मागेल. त्याने महामृत्युंजय मंत्र रचला आणि शिवमंदिरात बसून सतत जप सुरू केला.



महामृत्युंजय मंत्राची शक्ती मार्कंडेय कथामार्कंडेयचे १६ वर्ष पूर्ण होताच यमराजाचे दूत त्याला घेण्यासाठी आले. मात्र मार्कंडेय शिवलिंगाला मिठी मारून महामृत्युंजय मंत्राचा जप करत होता. यमदूतांनी त्याला स्पर्श करण्याचे धाडस केले नाही. ते तसेच परत फिरले. यमराजाला सांगितले, की आम्ही त्या भक्ताला हात लावू शकत नाही. यमराज स्वतः मार्कंडेयला घेण्यासाठी आले. मार्कंडेयने यमराजाला पाहूनही मंत्रजप थांबविला नाही. शिवलिंगाला अधिक घट्ट मिठी मारली. यमराजाने त्याला खेचण्याचा प्रयत्न केला तेव्हा मंदिर गर्जनेने थरथरले. तेजस्वी प्रकाशात भगवान महाकाल शिवलिंगातून प्रकट झाले. त्यांनी त्रिशूळ उगारत यमराजाला इशारा दिला, की माझ्या भक्ताला हात लावण्याची तुझी हिंमत कशी झाली ? यमराज थरथर कापत म्हणाले, की प्रभू, मी तुमचा सेवक आहे. जीवांचे प्राण घेण्याचे कार्य तुम्हीच मला सोपविले आहे. महादेवांचा क्रोध शांत झाला आणि ते म्हणाले, की मार्कंडेयच्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे.

त्याला मी दीर्घायुष्याचा आशीर्वाद देतो. तू त्याला घेऊ शकणार नाही. यमराज म्हणाले, की प्रभू, तुमचा आदेश सर्वोच्च आहे. जो कोणी मार्कंडेयाने रचलेला महामृत्युंजय मंत्र जपेल त्याला मी हानी पोहोचविणार नाही.

### महामृत्युंजय मंत्राचे फायदे : दीर्घायुष्य आणि आरोग्य

हा मंत्र मृत्यूच्या भीतीवर मात करतो. दीर्घ, निरोगी आयुष्य देतो.

**आध्यात्मिक उन्नती :** नियमित जपामुळे मनःशांती, एकाग्रता आणि आध्यात्मिक प्रगती होते.

**रक्षा आणि समृद्धी :** हा मंत्र रोग, बाधा आणि संकटांपासून संरक्षण देतो आणि समृद्धी वाढवितो.

मार्कंडेय ऋषींनी रचलेला महामृत्युंजय मंत्र भगवान शिव यांच्या भक्तीचे प्रतीक आहे. या मंत्राच्या जपाने मार्कंडेयने मृत्यूलाही हरविले. हा शक्तिशाली मंत्र आजही आरोग्य, समृद्धी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी जपला जातो.

### कुबेर पूजन कसे कराल ?

कुबेर पूजनासाठी प्रथम जागा स्वच्छ व शुद्ध करावी. उत्तर दिशेला कुबेराची मूर्ती अथवा प्रतिमा ठेवावी. पूजा सुरू करण्यापूर्वी संकल्प करावा. सर्वप्रथम श्री गणपती यांचे पूजन करावे. त्यांनतर कलश पूजन करावे. दिवा लावून त्याची पूजा करून कुबेराच्या मूर्तीपासून उजव्या बाजूस ठेवावा. तसेच लक्ष्मी माता व भगवान कुबेर यांना आवाहन करावे. पूजेदरम्यान धूप आणि पंचामृत यासारख्या गोष्टी अर्पण कराव्यात. त्यानंतर कुबेर मंत्राचे पठण श्रद्धाभावाने करावे.



# कथा कल्पतरू



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पूर्वी वृषपर्वा या नावाचा एक महान पराक्रमी राजा होऊन गेला. प्रसिद्ध शुक्राचार्य हे त्या राजाचे गुरू होय. एके दिवशी वृषपर्वा राजाची मुलगी राजकन्या शर्मिष्ठा व शुक्राचार्यांची मुलगी देवयानी अशा दोघी आपल्या सख्यांना बरोबर घेऊन एका रमणीय सरोवरावर स्नानासाठी गेल्या होत्या. पाण्याने तुडुंब भरलेले सरोवर पाहून सर्व मुलींना जलक्रीडा करण्याची इच्छा झाली. त्या मुलींनी आपली वस्त्रे एका वृक्षाजवळ सोडून ठेवली व त्या निश्चिंत मनाने पाण्यात पोहू लागल्या. इतक्यात त्या मार्गाने भगवान शंकर चालले होते. त्यांना पाहून सर्व मुली लाजल्या व घाईघाईने बाहेर येऊन आपापले वस्त्र परिधान करू लागल्या. त्या गडबडीत चुकून देवयानीने शर्मिष्ठेचे वस्त्र घेतले व शर्मिष्ठेनेही घाईत देवयानीचे वस्त्र घेतले व ते ती नेसू लागली.

पण ती चूक तिच्या लागलीच लक्षात आली. हे आपले वस्त्र नसून देवयानीचे वस्त्र आहे. पाहताच अभिमानाने तिचे डोळे भडकले व तिने देवयानी नेसत असलेले आपले वस्त्र रागाने ओढून तिला नग्न केले. भुवया चढवून ती म्हणाली, की भिकारडे, तू राजकन्येची वस्त्रे नेसतेस होय. मूठ- मूठ दाणे मागून निर्वाह करावा; अशी तुझ्या पित्याची योग्यता, असे असून तू एकदम माझे वस्त्र घेऊन माझा असा उपमर्द करितेस, याची लाज वाटत नाही ? हे ऐकून देवयानी म्हणाली, की ' बाई शर्मिष्ठे माझा पिता ब्राह्मण आहे. भिक्षा मागणे हे त्याचे कर्तव्य आहे. पण त्याची योग्यता किती आहे हे तुझ्या बापालाच विचार. राजे कितीही मोठे असले तरी गुरूच्या आशीर्वादाने त्यांना राज्य मिळते, हे तुला माहीत नाही! हे ऐकून त्या उन्मत्त शर्मिष्ठेला विशेषच राग आला. तिने रागाने देवयानी जे स्वतःचे वस्त्र नेसली होती तेही फेडून घेतले व तशा नग्न स्थितीत देवयानीस एका विहिरीत ढकलून देऊन ती सख्यांसह वर्तमान आपल्या मंदिरात निघून गेली.

इकडे ज्या विहिरीत देवयानीस ढकलून दिले होते, त्याच विहिरीजवळ ययाती राजा शिकार करून थकल्यामुळे पाणी पिण्यासाठी आला होता. राजाने विहिरीत पाहिले तो विहिरीत एक तरुण, सुंदर व उपवर अशी स्त्री रुदन करीत आहे. नग्न स्थितीत असलेल्या स्त्रीला पाहून राजाला तिची अत्यंत दया आली. त्याने आपल्या अंगावरील शेला काढून तो तिच्या अंगावर टाकला व तिला त्या विहिरीतून बाहेर काढले. नंतर ' जरूर असल्यास तुझ्या घरी पोहोचते करतो ' असे तो म्हणाला. तेव्हा देवयानी ययातीचा हात धरून म्हणाली, की तू मला नग्न स्थितीत पाहिलेस.

तू आपल्या वस्त्राने झाकलेस, शिवाय माझ्या हाताला स्पर्श करून बाहेर काढलेस. तेव्हा आता मला तुजबरोबर विवाह करणे भाग झाले आहे. मी शुक्राचार्यांची मुलगी देवयानी आहे.

हे ऐकून ययाती राजा म्हणाला, की देवयानी, तू ब्राह्मणकन्या असून मी क्षत्रिय आहे. क्षत्रियाने ब्राह्मणाच्या मुलीबरोबर विवाह करू नये, असे शास्त्र आहे. तेव्हा मला तुझ्याबरोबर विवाह कसा करता येईल ? धर्मविरहित मी आचरण करणार नाही. तेव्हा देवयानी म्हणाली, की ' राजा, तुझे म्हणणे बरोबर आहे. पण मला ब्राह्मण पती मिळणार नाही, असा शाप असल्यामुळे क्षत्रियाबरोबरच विवाह करणे मला भाग झाले आहे. ययाती राजा देवयानीचे हे बोलणे ऐकून देवयानीला म्हणाला, की देवयानी, तुला असा कोणाचा शाप झाला आहे, ते ऐकण्याची माझी इच्छा आहे. राजाची ती इच्छा जाणून देवयानी आपली शापाची हकिकत ययातीला सांगू लागली.

# आनंद, उत्साह अन् सजीव परंपरेचा सोहळा

## दिवाळी तयारी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा सण नाही. तो आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि कौटुंबिक बंधनांचा उजळवटा आहे. वर्षभराच्या धकाधकीनंतर दिवाळी ही आपल्याला थोडा विसावा देते. आत्मपरीक्षणाची आणि नवचैतन्याने पुढे जाण्याची संधी देते. दिवाळीच्या सणात तयारीला विशेष महत्त्व आहे. त्याचे कारण ही तयारी म्हणजेच उत्सवाचा खरा आत्मा असतो.

**स्वच्छतेपासून सुरूवात**

दिवाळीच्या तयारीची सुरूवात घराची आणि मनाची स्वच्छता करण्यापासून होते. घराची झाडाझडती, रंगरंगोटी, नव्या वस्तूंची खरेदी हे सगळे वातावरण प्रसन्न करते. ' जसे घर तसे मन ' या उक्तीप्रमाणे ही स्वच्छता आपल्याला सकारात्मक विचारांसाठी जागा करून देते.

**पारंपरिक खरेदी व सजावट**

दिवाळी म्हटले, की खरेदी आलीच. साड्या, कपडे, घरगुती वस्तू, आकाशकंदील, पणत्या, रांगोळीचे साहित्य अशा असंख्य गोष्टींची खरेदी केली जाते. बाजारपेठा सजून निघतात, स्थानिक विक्रेत्यांसाठी ही सुवर्णसंधी असते. सेंद्रिय पणत्या, पर्यावरणपूरक आकाशकंदील, स्थानिक हस्तकला या गोष्टींना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे.

**फराळाची चव**

दिवाळीचा खरा गोडवा म्हणजे पारंपरिक फराळ. चकली, करंजी, लाडू, चिवडा अशा पदार्थांचा दरवळ घराघरांत दरवळतो. हल्ली अनेक जण फराळासाठी घरगुती स्वयंपाकाला पसंती देतात. हे पदार्थ बनविताना कुटुंब एकत्र येते. त्यातून प्रेम व सहकार्य यांची चव देखील त्यात मिसळते.

**सामाजिक जबाबदारी**

दिवाळीचा खरा आनंद शेअर करण्यात आहे. समाजातील गरजू, निराधार, वृद्ध यांच्याशी हा आनंद वाटून घेतल्यास दिवाळीचे खऱ्या अर्थाने सोने होते. अनेक संस्था दिवाळीच्या निमित्ताने मदतकार्य करत असतात. आपणही या कार्यात सामील होऊन समाजाची खरी सेवा करू शकतो.

**पर्यावरणपूरक दिवाळी**

आजच्या काळात पर्यावरणाची काळजी घेणे अत्यावश्यक झाले आहे. फटाक्यांमुळे होणारा ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळणे गरजेचे आहे. मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करून आपण आरोग्यदायी आणि सुरक्षित दिवाळीकडे पाऊल टाकू शकतो.

दिवाळी ही केवळ परंपरेची आठवण नाही, तर ती नवसंकल्पांची सुरूवात आहे. ही तयारी ही केवळ घरापुरती मर्यादित नसून, ती आपल्याला आत्मिक आनंद, कुटुंबातील स्नेह आणि सामाजिक जाणीव यांची उजळण घडवते.






# शुक्रनीती



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जोपर्यंत शत्रूचे बळ आपल्यापेक्षा अधिक आहे तोपर्यंत त्याला खांद्यावर घ्यावा. त्याचा आदर करावा. जेव्हा ध्यानात येईल की तो निर्बल झाला आहे तेव्हा रिकाम्या मडक्याला दगडावर आपटून फोडून टाकतात, तसा त्याला नष्ट करावा.

ज्याप्रमाणे सज्जनतारूपी भूषण मनुष्याला भूषित करतो तसे अलंकार, राजा, पराक्रम, विद्या किंवा धन भूषित करीत नाही.

चुंगलखोरी, क्रोध, चोरी, मत्सर, अतिलोभ, खोटे बोलणे, कार्य नष्ट करणे, आळस हे सर्व दोष आहेत. हे दोष गुणवानाला असले तरी ते त्याच्या सर्व गुणांना झाकून टाकतात. या दोषांमुळे तो निंदेस पात्र ठरतो. श्रीमंताला मूल नसणे, दरिद्री माणसाला भूक लागणे, स्त्रीला नपुंसक पती मिळणे, प्रिय वस्तूंची चोरी होणे, या सर्व गोष्टी सुखकर नसतात. म्हणजेच दुःख देणाऱ्या आहेत.

मूर्ख मुलगा, मूर्ख मुलगी, अत्यंत क्रोधी स्त्री, दरिद्रता, नीच पुरुषाची सेवा, नियमित कर्ज घेणे या सहा गोष्टी सुखकर नाहीत. यामुळे मनुष्य नेहमी दुःखी रहातो.

जो मुलगा आई-वडिलांच्या आज्ञांचे पालन करतो, त्यांची सेवा करण्यात आळस करीत नाही. उलट सावलीप्रमाणे नेहमी त्यांची सोबत करतो, धन आणि विद्या कमाविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो. सर्व प्रकारच्या विद्यांमध्ये निपुण होतो. तो मुलगा आई-वडिलांचा आनंद वाढविणारा होतो. जो माता-पित्याच्या आज्ञेच्या विरुद्ध वागतो, दुर्गुणी असतो, धनाचा नाश करणारा असतो, तो दुःखदायकच असतो.

जी स्त्री आपल्या पतीवर नेहमी प्रेम करणारी, गृहकृत्यात चतुर, पुत्र देणारी, सुशील आणि सुंदर जीवन देणारी असते ती पतीला प्रिय असते.

जी आई मुलांच्या अपराधांना क्षमा करणारी असते. मुलांचे पालनपोषण नीट करते ती नेहमी आनंद देते. याउलट वागणारी व्यभिचारीणी असते ती दुःख देणारी असते.

जो पिता मुलाला विद्वान बनविण्यासाठी, त्याला सुखी जीवन जगता यावे. स्थावर घरदार ठेवण्याचा प्रयत्न करतो, नेहमी मुलाला उत्तम शिक्षण देतो. आपल्यावर कोणाचेही ऋण ठेवीत नाही तो पिता आनंददायक होतो.

जो मनुष्य नेहमी मदत करतो, कधी उलट बोलत नाही, सत्य आणि हितकर गोष्टींचा उपदेश करतो, धन प्रेमाने देतो व घेतोही तो मित्र बनतो.

नीच माणसांबरोबर घनिष्ट मैत्री करणे, दुसऱ्याच्या घरी वारंवार जाणे, आपल्या जातीतील लोकांबरोबर प्रतिकूल आचरण करणे. दरिद्रता या सर्वांमुळे मानहानी होते. क्षत्रियांचे तेज अधिक तमोगुणी असते, ब्राह्मणांचे तेज अधिक सत्वगुणी आणि इतर वैश्यांचे तेज अधिक रजोगुणी असते. यामध्ये सत्त्वगुणी तेजच श्रेष्ठ असते.

जी जीवन पद्धती आपल्या धर्माची हानी करीत नाही ती जीवन पद्धती श्रेष्ठ आहे. ज्या देशात आपल्या कुटुंबाचे पालन पोषण नीट प्रकारे करता येते तो देश सर्वोत्तम असतो.

गुणवान, शीलवान पत्नी, सुंदर गुणाची मुले, उत्तम विद्या, उत्तम धन, चांगला मित्र, चांगले नोकर, चांगली सुंदर मोलकरीण, रोग रहित शरीर, सुंदर घर, चांगला राजा या दहा गोष्टी गृहस्थाश्रमी माणसाला सुख देणाऱ्या असतात.

जो दुर्गुणाला गुण सांगून त्याचे वर्णन करतो तो सर्वांना प्रिय होतो. जो गुणाला मोठा सांगून प्रशंसा करतो तो अवश्य मित्र बनतो.

जो सत्याला दुर्गुण समजतो तो प्रिय असूनही ऐकणाऱ्याला अप्रिय होतो. जो गुणाला दुर्गुण सांगतो तो कसा प्रिय होईल ?

मनुष्याने संकटाच्या काळात कोणा सबळ माणसाने खोटी सत्य गोष्ट सांगावयास सांगितले तर मुके बनावे. वाईट गोष्ट पहाण्यास आंधळे, वाईट ऐकण्यासाठी बहिरा आणि वाईट करण्यासाठी धावायचे असेल तर लंगडा बनावे. काहीतरी कारणाने वाईट व्यवहार करण्याचे टाळावे. जर असे केले नाही तर तो दुःखी होईल.

पारतंत्र्यापेक्षा दुसरे मोठे दुःख नाही आणि स्वातंत्र्यापेक्षा मोठे दुसरे सुख नाही. प्रवास न करणारा तसेच स्वाधीन होऊन आपल्या घरातच रहाणारा मनुष्य सुख प्राप्त करतो.

नवीन आणि जुन्या व्यवहारांत चतुर लोकांच्या बुद्धीने प्रतिक्षण नवे-नवे व्यवहार होत राहतात. त्या सर्वांना सांगणे कठीण आहे म्हणून प्रत्यक्ष, अनुमान, उपमान तसेच शब्द प्रमाण यांच्यातर्फे ज्ञान प्राप्त केले पाहिजे. या प्रकाराने संक्षिप्त रूपात सामान्यतः राजा तसेच राष्ट्र ह्या दोघांच्या संबंधामध्ये, विशेष करून राजासाठी जे हितकारी आहे ते सांगितले आहे.